# कार्यालय नागपूर महानगरपालिका नागपूर
## (स्थापना विभाग)

## जाहीरात

नागपूर महानगरपालिकेच्या स्वंयअर्थसहाय्यीत माध्यमिक शाळांमध्ये रिक्त इंग्रजी– तृतीय भाषा, गणित व विज्ञान विषयांच्या अनुक्रमे हिंदी माध्यम – २८ पदे व उर्दू माध्यम– २९ पदे अशा एकंदर ५७ जागांसाठी शिक्षण सेवक या पदाच्या खाली दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे जागा भरण्याकरीता दि.२३.०६.२०१४ ते ०७.०७.२०१४ पर्यंत रजिस्टर पोस्टाव्दारे विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>माध्यम</th><th>विषय</th><th>पदसंख्या</th><th>शैक्षणिक अर्हता</th><th>शेरा</th><th>संवर्ग व विषय निहाय आरक्षण</th></tr>
<tr><td rowspan="3">१</td><td rowspan="3">उर्दू</td><td>इंग्रजी</td><td>११</td><td>पदवी अधिक बी.एड. इंग्लिश लिटरेचर</td><td rowspan="3">शालांत परीक्षा उर्दू माध्यमातून (प्रथम भाषा उर्दू) उत्तीर्ण करणे आवश्यक</td><td rowspan="3">
<table>
<tr><th>इंग्रजी</th><th>गणित</th><th>विज्ञान</th></tr>
<tr><td>अजा-२</td><td>अजा-१</td><td>अजा-१</td></tr>
<tr><td>अज-०</td><td>अज-१</td><td>अज-१</td></tr>
<tr><td>विजाअ-१</td><td>विजाअ-०</td><td>विजाअ-०</td></tr>
<tr><td>भजब-०</td><td>भजब-०</td><td>भजब-१</td></tr>
<tr><td>भजक-०</td><td>भजक-१</td><td>भजक-०</td></tr>
<tr><td>विमाप्र-१</td><td>विमाप्र-०</td><td>विमाप्र-०</td></tr>
<tr><td>इमाव-१</td><td>इमाव-२</td><td>इमाव-२</td></tr>
<tr><td>मुक्त-६</td><td>मुक्त-४</td><td>मुक्त-४</td></tr>
<tr><td>११</td><td>९</td><td>९</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>गणित</td><td>९</td><td>बी.एस.सी. बी.एड. (गणित)</td></tr>
<tr><td>विज्ञान</td><td>९</td><td>बी.एस.सी. बी.एड. (रसायनशास्त्र/जीवशास्त्र)</td></tr>
<tr><td rowspan="3">२</td><td rowspan="3">हिंदी</td><td>इंग्रजी</td><td>१०</td><td>पदवी अधिक बी.एड. इंग्लिश लिटरेचर</td><td rowspan="3">शालांत परीक्षा हिंदी माध्यमातून (प्रथम भाषा हिंदी) उत्तीर्ण करणे आवश्यक</td><td rowspan="3">
<table>
<tr><th>इंग्रजी</th><th>गणित</th><th>विज्ञान</th></tr>
<tr><td>अजा-२</td><td>अजा-१</td><td>अजा-१</td></tr>
<tr><td>अज-०</td><td>अज-१</td><td>अज-१</td></tr>
<tr><td>विजाअ-१</td><td>विजाअ-०</td><td>विजाअ-०</td></tr>
<tr><td>भजब-०</td><td>भजब-०</td><td>भजब-१</td></tr>
<tr><td>भजक-०</td><td>भजक-१</td><td>भजक-०</td></tr>
<tr><td>विमाप्र-१</td><td>विमाप्र-०</td><td>विमाप्र-०</td></tr>
<tr><td>इमाव-१</td><td>इमाव-२</td><td>इमाव-२</td></tr>
<tr><td>मुक्त-५</td><td>मुक्त-४</td><td>मुक्त-४</td></tr>
<tr><td>१०</td><td>९</td><td>९</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>गणित</td><td>९</td><td>बी.एस.सी. बी.एड. (गणित)</td></tr>
<tr><td>विज्ञान</td><td>९</td><td>बी.एस.सी. बी.एड. (रसायन शास्त्र/जीवशास्त्र)</td></tr>
</table>

### १) अर्ज करण्याची पध्दत –

१) विस्तृत जाहिरात व अर्जाचा नमुना म.न.पा.चे अधिकृत संकेतस्थळ www.nmcnagpur.gov.in वर प्रकाशित करण्यात आलेला आहे.

२) दि. २३ जुन २०१४ ते ७ जुलै २०१४ पर्यंत ''प्रति, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग(माध्यमिक), नागपूर महानगरपालिका केंद्रिय कार्यालय, सिव्हिल लाईन, महानगरपालिका मार्ग, नागपूर–४४०००१'' या पत्त्यावर विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज फक्त रजिस्टर पोस्टाने स्विकारण्यात येतील. लिफाफ्यावर अर्जदाराने आपले संपूर्ण नाव, अर्ज करत असलेल्या पदाचे व विषयाचे नाव तसेच माध्यम नमुद करावे.

३) अर्जासोबत शालांत परीक्षा (इयत्ता १० वी ची) गुणपत्रिका, पदवी परीक्षेची अंतीम वर्षाची गुणपत्रीका, शिक्षणशास्त्र पदवी (B.Ed.) ची गुणपत्रीका, प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास जात वैधता प्रमाणपत्र या प्रमाणपत्रांच्या सक्षम दंडाधिकारी यांनी साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती हे प्रमाणपत्र आवश्यक राहतील अन्यथा अर्ज रद्द करण्यात येईल. पदव्युत्तर पदवी (ज्या विषयासाठी अर्ज भरत आहे फक्त त्यातच) उत्तीर्ण केली असल्यास सोबत जोडावी. नागपूर म.न.पा. मध्ये कार्यरत घडयाळी तासिका शिक्षकांना प्राधान्या करीता मुख्याध्यापक/शिक्षणाधिकारी म.न.पा. यांनी प्रमाणित करून दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र (शहनिशा शिक्षण, मुख्यालय स्तरावर करण्यात येईल या अटी अधीन) आवश्यक राहील.

४) उमेदवारांचे अर्ज फक्त रजिस्टर पोस्ट पध्दतीनेच स्विकारण्यात येत असून अर्ज करतांना उपरोक्त नमुद कागदपत्रे जोडणे आवश्यक राहील. अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा तृटी राहील्यास आवश्यक कागदपत्रे न जोडल्यास व भरतीच्या कुठल्याही टप्प्यात अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. रजिस्टर पोस्ट व्दारा प्राप्त अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरात नमुद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण, इ. पात्रता तपासून उमेदवारांनी अर्ज भरावा.

## २) सर्वसाधारण अटी व उमेदवारांकरीता सुचना –

१) वयोमर्यादा – प्रस्तुत सर्व पदांकरीता किमान वयोमर्यादा १८ असून कमाल वयामर्यादा ३३ वर्षे ही राहील. महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरीता वयोमर्यादेची अट ५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.

२) कोणताही अर्ज स्वहस्ते स्विकारण्यात येणार नाही व पोस्टाचे दिरंगाईमुळे उशीरा प्राप्त अर्जाची जबाबदारी म.न.पा. ची राहणार नाही.

३) प्राप्त अर्जामधून प्रवर्गनिहाय/विषयनिहाय व माध्यमनिहाय अ. क्र. (अ) व (ब) मध्ये नमूद निकषाप्रमाणे १ पदांकरीता ३ उमेदवार या प्रमाणे यादी दि.१३ जुलै २०१४ पर्यंत तयार करून म.न.पा. चे अधिकृत संकेतस्थळावर टाकण्यात येईल. तद्नंतर गुणवत्ताक्रमाने मूळ प्रमाणपत्र तपासणी करीता दि.१६ जुलै २०१४ ला बोलविण्यात येवून तपासणी करून अंतीम निवड यादी तयार करण्यात येईल.

४) अर्जासोबत अनुसूचित जाती व जमाती तसेच अपंग उमेदवारांकरीता प्रवेश शुल्क रू.१००/– चा व इतरांसाठी रू. २००/– चा कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंकेचा ''नागपूर महानगरपालिका, नागपूर'' यांचे नावे असलेला (Non Refundable) डिमांड ड्राफ्ट (DD) जोडणे आवश्यक आहे. डिमांड ड्राफ्ट चे मागे अर्जदाराने आपले संपूर्ण नाव व भरत असलेल्या पद व विषयाचे नाव नमुद करावे.

५) अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरून पात्र उमेदवारांची यादी, मुळ प्रमाणपत्र तपासणीचे केंद्र, वेळापत्रक, अंतीम निवड यादी, इ. बाबतची माहिती म.न.पा. चे अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध राहील. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची अद्यावत माहिती जाणून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. अर्जासोबत उमेदवाराने आपला सद्यस्थितीत चालू असलेला E-Mail ID पुरवावा. जेणेकरून विभागाव्दारा मुळ कागदपत्रे तपासणी किंवा इतर टप्प्यांवरील माहितीकरीता संदेश देणे शक्य होईल.

६) भरती प्रक्रियेबाबत सर्व प्रकारचे निर्णय घेण्याचे, प्रक्रिया स्थगितीचे वा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांना असून त्यांचा निर्णय अंतीम असेल त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी/मा.आयुक्त यांना राहील. व त्यांचा निर्णय अंतीम असेल. याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

७) इतर राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरीता आरक्षीत पदांकरीता विचार केला जाणार नाही.

८) सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही–२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही–२०००,प्र.क्र.१७/२०००/१२, १ जुलै, २००५ नुसार विहीत केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ,ब,क,ड मधील सेवाप्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना 'अ' आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे. सदर प्रतिज्ञापन अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. प्रतिज्ञापत्राचा नमुना परिशिष्ठ 'अ' प्रमाणे आहे.

९) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासप्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.२९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) आणि भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासप्रवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वर्ष २०१४–१५ करीता वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०) शासन निर्णय सा.प्र.वि. क्र. प्रशासन–२०००/प्र. क्र.५/२००१/३२, दि.२०.०७.२००२ व दि.१९.०३.२००३ शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणे/वापराबाबतचे खालील नमुद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचे आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

ब) महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

११) अर्ज सादर केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे. असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्याचे आढळल्यास, एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब

केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल. व त्यांचेविरूध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

१२) निवड सूची मधून उमेदवारांची गुणवत्ता अनुक्रमे नियुक्तीसाठी शिफारस झाल्यानंतर शिफारस झालेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबंधीत पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार किंवा जाती प्रमाणपत्र किंवा कोणत्याही करणास्तव संबंधीत उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडसुचीतील अतिरीक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवाराची निवड करण्यात येईल.

१३) कोणताही किंवा सर्व अर्ज त्यासाठी काहीही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार म.न.पा. प्रशासन राखून ठेवित आहे.

## ३) निवडीचे निकष –

अ) शिक्षण सेवक भरती प्रक्रियेत उमेदवारांचे पदवीचे गुणांची टक्केवारी + शिक्षणशास्त्र पदवी (B.Ed.) मध्ये लेखी परीक्षेत प्राप्त गुणांची टक्केवारी यांची सरासरी काढून गुणवत्ता यादी तयार करण्यात येवून यादीतील गुणवत्तानुक्रमे नियुक्ती देण्यात येईल. तसेच ज्या विषयासाठी अर्ज सादर करत आहे, त्याच विषयात पदव्युत्तर पदवी (Post Graduation) उत्तीर्ण केली असल्यास त्याचा एक टक्का अतिरिक्त गुण 'अ' मध्ये नमुद सरासरी टक्केवारीत देण्यात येईल.

ब) शैक्षणिक सत्र २००९–१० ते २०१३–२०१४ मध्ये नागपूर महानगरपालिकेत कार्य केलेल्या घडयाळी तासिका शिक्षकांना त्यांनी केलेल्या अध्यापनाच्या प्रत्येकी १ शैक्षणिक वर्षासाठी १ टक्के गुण अतिरिक्त स्वरूपात (अ) मध्ये नमूद सरासरी टक्केवारीत देण्यात येईल व त्याप्रमाणे गुणवत्ता यादीत स्थान देण्यात येईल.

क) प्रस्तूत पदे हिंदी व उर्दू माध्यमाच्या शांळाकरीता भरावयाची असल्यामुळे यासाठी उमेदवाराचे शालांत शिक्षण या माध्यमातून होणे आवश्यक आहे. या करीता उमेदवाराचे शालांत परिक्षेचे गुणपत्रिकेत प्रथम भाषा म्हणून हिंदी माध्यमाकरीता हिंदी व उर्दू माध्यमाकरीता उर्दू असणे आवश्यक आहे.

ड) इंग्रजी तृतीय भाषेकरिता इंग्लिश लिटरेचर, गणित विषयाकरिता गणित, विज्ञान विषयाकरिता रसायनशास्त्र किंवा जीवशास्त्र हे विषय शिक्षणशास्त्र पदवी (B.Ed) मध्ये Method म्हणून असणे अनिवार्य राहील.

इ) प्रवर्ग निहाय उमेदवारांची नियुक्ती करतांना जात वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा प्रवर्ग निहाय आरक्षणाचा लाभ न देता अशा उमेदवारांचा मुक्त संवर्गात विचार करण्यात येईल. मागासवर्गीय उमेदवारांचा एकाच अर्जावर प्रवर्गनिहाय व सर्वसाधारण जागांसाठीसुध्दा विचार करण्यात येईल.

ई) एकाच पदासाठी २ किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास खालील प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतीम निवड केली जाईल.

१. शिक्षणशास्त्र पदवी (B.Ed) मध्ये मिळालेल्या एकुण गुणांचे आधारे त्यानंतर,

२. वय (वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल)

उ) निवडलेल्या उमेदवारांना विहीत मंजूरी व प्रक्रियेनंतर ३ वर्षे व परिविक्षा कालावधी करीता 'शिक्षणसेवक' या पदावर रू. ८,०००/– मासिक या प्रमाणे नेमणूक व तद्नंतर शासन निर्णयाप्रमाणे हा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर सहा. शिक्षक या पदी अंशदायी पेंशन योजना अंतर्गत वाजवी भत्ते व वेतनमानावर म.न.पा. आस्थापनेवर नियमित करण्यात येईल.

(मा.आयुक्त यांचे दि.२०.०५.२०१४ चे मंजुरीन्वये)

(हेमंतकुमार पवार)
अप्पर आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर

# शिक्षणसेवक (माध्यमिक) या पदासाठी अर्ज सादर करण्याबाबत

नुकताच काढलेला फोटो चिकटविणे

**प्रति,**

मा.आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

1) उमेदवाराचे पूर्ण नाव – ...........................................................................................

2) पदाचे नाव – शिक्षणसेवक (माध्यमिक), विषय – इंग्रजी/गणित/विज्ञान, माध्यम– हिंदी/उर्दू

3) पत्रव्यव्हाराचा पत्ता – ..............................................................................................

..............................................................................................

भ्रमणध्वनी क्र. ......................... E-Mail ID..........................................

4) जन्मतारीख – .................................... (अंकात)

5) जात प्रवर्ग – ..................................................

6) शालांत परीक्षेचे माध्यम – हिंदी / उर्दू (शालांत परीक्षेत असलेली प्रथम भाषा/1st Language in SSC)

7) शैक्षणिक अर्हता – B.A (English Lit.)/B.Sc (Maths/Physics)/ B.Sc (Chemistry) / B.Sc (Biology)

8) पदवीची टक्केवारी [ ] एकुण गुण [ ] प्राप्त गुण [ ]

9) व्यावसायिक अर्हता – B.Ed. (Method - English Lit./ Maths /Chemistry/Biology)

10) शिक्षणशास्त्र पदवी (B.Ed.) मध्ये लेखी परीक्षेत प्राप्त गुणांचा तपशील –
टक्केवारी [ ] एकुण गुण [ ] प्राप्त गुण [ ]

11) नागपूर महानगरपालिकेमध्ये कार्य केलेल्या घडयाळी तासिका शिक्षक यांचा म.न.पा. चे माध्यमिक शाळांवर शिकविण्याचा एकुण अनुभव – ..............................................................................

12) पदव्युत्तर पदवी – M.A. (Eng. Lit.) / M.Sc.(Maths/Phy/Bio/Chemistry)

13) इतर अर्हता – ..............................................................................................

14) संगणक अर्हता (MS-CIT किंवा तत्सम) – ..........................................................

15) अर्जासोबत जोडलेल्या छायांकित प्रमाणपत्रांची यादी –(संलग्न केली असल्यास ( ✔ ) अशी खुण करावी)

१) शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) ची गुणपत्रिका    २) पदवी परीक्षेची अंतीम वर्षाची गुणपत्रिका

३) शिक्षणशास्त्र पदवी (B.Ed.) ची गुणपत्रिका    ४) लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन (नमुना–अ)

५) जात वैधता प्रमाणपत्र    ६) डिमांड ड्राफ्ट

७) घडयाळी तासिका शिक्षकांसाठी अनुभव प्रमाणपत्र (फक्त नागपूर म.न.पा. मध्ये कार्यरत असणाऱ्यांसाठी)

८) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सन २०१४–१५ करीता वैध असलेले (फक्त विजा(अ), भज(ब), भज(क), भज(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासप्रवर्ग यांचेकरीता)

९) इतर MS-CIT किंवा तत्सम संगणक प्रमाणपत्र    १०) M.A. (Eng. Lit.)/M.Sc.(Maths/Phy/Bio/Chemistry)

प्रमाणित करण्यात येते की, या अर्जात नमूद केलेली सर्व माहिती खरी असून अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे संलग्न केलेली आहेत. अर्जासोबत संलग्न अनिर्वाय कागदपत्रे अपुरी असल्यास माझा अर्ज रद्द होईल, याची मला जाणीव आहे. तसेच माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास नियमाप्रमाणे मी कार्यवाहीस पात्र राहील.

ठिकाण :
दिनांक :

**उमेदवाराची सही**

.............................................................................................................................

## कार्यालयीन तपासणी

१. अर्ज प्राप्त दिनांक –

२. आवश्यक कागदपत्रे जोडली आहेत काय    होय/नाही

उपरोक्त माहिती तपासणाऱ्याचे नाव – ..........................................................................

पदनाम – ....................................

**स्वाक्षरी**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना - "अ"**

**( नियम ४ पहा )**

मी, श्री/ श्रीमती/कुमारी -----------------------------------------------------------------

श्री.------------------------------------------------------------ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी.

वय-------------- वर्षे, राहणार-------------------------------------------------------------

याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी--------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ---------------------------- ( संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक--------------------------------------------------- यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या----------------- आहे ( असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.३.२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणिव आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :**

**(अर्जदाराची सही)**